# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा—हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/०७४ /२००९

अर्जदार : श्री दिवेश महेंद्र धुर्वे
राहणार दुर्गामाता मंदिरा जवळ,
नवि बस्ती,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
सिव्हील लाईन विभाग,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती :

1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा—हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्री एस.एफ.लांजेवार
कार्यकारी अभियंता तथा
सदस्य—सचिव,
ग्राहक गा—हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा—हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

— आदेश —

पारीत दि. ०३.०२.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी सदर तक्रार अर्ज दिनांक 31.12.2009 रोजी महाराष्ट्र राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

<u>अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील</u> :–

तक्रारकर्त्याने सदर तक्रार नविन वीज मीटर मिळण्याकरिता तसेच मागील थकबाकी खोटी असल्यामुळे रद्य करण्याकरीता प्राथना केलेली आहे. तक्रारकर्ता हा गैर अर्जदाराचा अधिकृत ग्राहक असुन त्याला जास्तीचे विज बिल देण्यात आले आहे. त्याचे कडे कमी वापर असुनही जास्तीचे विज बिल देण्यात आले.

तक्रार कर्त्याने दिनांक 15.10.2009 ला अतंर्गत तक्रार निवारण कक्षात तक्रार दिलेली होती. परंतु त्याचा विचार करण्यात आलेला नाही.

अर्जदार हा छावणी उप केंद्रा अंतर्गत राहणारा असुन त्याने नविन ईलेक्ट्रीक मीटर करीता अर्ज केल्यानंतरही ६ ते ८ महिन्यापर्यत देण्यात आलेले नाही. तसेच त्याला खोटया विज चोरीचा प्रकरणात गुंतवेलेले असुन त्याला रूपये 10,324/– थकबाकी भरण्यास सांगितले आहे.

अर्जदाराचे म्हणणे त्याच्या राहत्या घरावर कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, तेव्हा त्याला नविन विद्युत पुरवठा देण्यात यावा. तसेच विद्युत मीटर न देण्या–या अधिका–यावर कारवाई करण्यात यावी. तक्रारकर्त्याने जुने थकबाकी विज बील रद्य करून मानसिक त्रासापोटी रू. 10,000/– भरपाई देण्यात यावी. अशी प्रार्थना केली आहे.

गैरअर्जदाराने आपले मुद्यानिहाय उत्तर हया मंचात दिनांक 14.01.2010 रोजी दिलेले आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे असे की तक्रार कर्त्यास विज चोरी करतांना पकडलेले असुन त्याबदद्ल चे Assessment & Compounding charges ची रक्कम सांगितले होते. तक्रार कर्त्याने दि. 31.08.2009 रोजी दोन्ही रक्कमा भरलेल्या आहेत.

पंरतु तक्रार कर्ता राहत असलेल्या घरावर श्री तुकाराम धुर्वे यांच्या नावाने ग्राहक कं. 410011946171 वर रू. 6,206-85 पी.डी. थकबाकी आहे ती ग्राहकाने भरलेली नाही, त्यामुळे नविन विज कनेक्शन देण्यात आलेले नाही.

गैरअर्जदाराने पुढे असे म्हटले आहे की. ग्राहकाने त्याच्या घरी कोणतेही जुने मीटर नव्हते असे खोटे विधान केलेले आहे. सदर घर तक्रार कर्त्याचे आजोबा श्री तुकाराम धुर्वे यांच्या नावावर आहे. गैरअर्जदाराने त्यासंबधीचा महानगरपालिकेचा कर आकारणीचा पुरावा दाखल केलेला आहे.

मंचाने दोन्ही पक्षाचे म्हणने एकुण घेतले, तक्रारकर्त्याने विज चोरी बदद्ल झालेला Assessment व Compounding ची रक्कम भरलेली असल्यामुळे तो मुद्या विचारात घेता येणार नाही.

तक्रारकर्त्यास नविन विज मीटर मिळण्याकरीता थकबाकी भरणे आवश्यक आहे, तक्रारकर्त्याने तक्रारकर्त्या हा तुकाराम धुर्वे यांचा वारस असल्याचे मान्य केलेले आहे. तक्रारकर्त्याने सदर घर आजोबांच्या नावाने नव्हते असे म्हटले आहे.

पंरतु गैरअर्जदाराने दाखल केलेल्या नागपूर महानगर पालिकेचा कर आकारणी घर कं. 2/A हे श्री तुकाराम धुर्वे यांच्या मालकीचे आहे असे स्पष्ट होते. तक्रार कर्त्याच्या जागेवर पुर्वीची रक्कम भरल्याशिवाय तक्रार कर्त्यास नविन मीटर देता येणार नाही.

तक्रार कर्ता हा मुळ मालकाचा नातु / कायदेशीर वारसदार असल्याने विनियम कंमाक 10.5 प्रमाणे थकबाकी पुर्ण रक्कम भरल्याशिवाय तक्रार कर्त्यास नविन मीटर देता येणार नाही.

तक्रार कर्त्याने विद्युत मीटर उशिरा देण्याकरिता दोषी अधिका–यावर कार्यवाही करावी तसेच मानसिक व शारीरीक त्रासा करिता 10,000 रूपये भरपाई देण्यात यावी असे म्हटले आहे.

वरील विवेचनावरून पूर्वीची थकबाकी भरल्याशिवाय नविन विज मीटर देता येत नाही हे स्पष्ट आहे. तसेच तक्रार कर्त्याला मानसिक व शारीरीक त्रास झाल्याचे मान्य करता येणार नाही, तक्रार कर्त्याची नुकसान भरपाईची मागणी अमान्य करण्यात येते.

## आदेश

दोन्ही पक्षाचे कागदपत्र व तोंडी निवेदन याचा विचार केल्यावर मंच अशा निष्कर्षाश आलेले आहे की, तक्रार कर्त्याची तक्रार पुर्णतः चुकीची असुन ती खारीज करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/– | सही/– | सही/– |
| (एस.एफ. लांजेवार) | (श्रीमती गौरी चांद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या् | सभापती |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM
**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION CO LTD's**
NAGPUR URBAN ZONE, NAGPUR.

सदस्य – सचिव
(कार्यकारी अभियंता)
ग्राहक गा-हाणे निवारण मंच (ना.श.प.)
म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर